दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आजचे पंचांग

वार: रविवार दिनांक: १ नोव्हेंबर २०२६ माह (अमावस्यांत): आश्विन माह (पूर्णिमांत): कार्तिक पक्ष: कृष्ण पक्ष ऋतु: हेमंत आयन: दक्षिणायन विक्रम संवत: २०८३ शक संवत: १९४८ संवत्सर: पराभव तिथी, नक्षत्र, योग आणि करण तिथी: सप्तमी तिथी (दुपारी ०२:५१ पर्यंत), त्यानंतर अष्टमी तिथी नक्षत्र: पुष्य नक्षत्र (पहाटे ०४:३० पर्यंत, १ नोव्हेंबर), त्यानंतर आश्लेषा नक्षत्र योग: साध्य योग (दुपारी ०२:३८ पर्यंत), त्यानंतर शुभ योग करण: भाव करण (दुपारी ०२:५१ पर्यंत),

कपडे वाळत घालताना विजेचा धक्का; महिलेचा मृत्यू

उरुळी कांचन । प्रतिनिधी

घराच्या मागील अंगणात कपडे वाळत घालत असताना लोखंडी तारेत उतरलेल्या विद्युत प्रवाहाचा तीव्र धक्का बसून ४० वर्षीय विवाहित महिलेचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (दि . ३१) दुपारी १२.०० वाजता थेऊर (ता. हवेली) येथील काकडे कॉलनी परिसरात घडली. सीमा विकास नरुटे (वय ४०, रा. थेऊर) असे मृत महिलेचे नाव आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ३८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात इंडिया आघाडीचा 'जनता महाभियोग'


६ गंभीर आरोप ठेवत हकालपट्टीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / प्रतिनिधी

निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि मतदार याद्यांमधील गोंधळाचा आरोप करत विरोधी पक्षांच्या 'इंडिया' (INDIA) आघाडीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी लोकसभेच्या माजी अध्यक्षा मीरा कुमार यांच्या अध्यक्षतेखाली विरोधी पक्षांनी एकत्र येत मुख्य निवडणूक आयुक्तांवर प्रतीकात्मक 'जनता महाभियोग' (Public Impeachment) चालवला. या कार्यक्रमात 'इंडिया' आघाडीने मुख्य निवडणूक आयुक्तांवर ६ गंभीर आरोप ठेवत त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची आणि हकालपट्टीची मागणी केली आहे.

विरोधी पक्षांच्या नेत्यांनी लावलेले ६ प्रमुख आरोप खालीलप्रमाणे आहेत:


* १. निवडणूक चोरीचा कट: निवडणूक आयोगाने सत्ताधाऱ्यांच्या फायद्यासाठी निवडणूक प्रक्रियेत फेरफार करून निवडणूक चोरीचा पद्धतशीर कट रचल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे.
* २. १३.२ कोटी मतदारांची नावे वगळणे: विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) मोहिमेच्या नावाखाली देशभरातील तब्बल १३.२ कोटी वैध मतदारांची नावे मतदार याद्यांमधून बेकायदेशीरपणे आणि पारदर्शकतेचा अभाव ठेवून वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.
* ३. संसदेला डावलून 'फॉर्म ६' मध्ये फेरफार: मतदार नोंदणीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या वैधानिक 'फॉर्म ६' (FoA°m 6) मध्ये संसदेची मंजुरी किंवा पूर्वकल्पना न देता एकतर्फी बदल करण्यात आल्याचा आरोप लावण्यात आला आहे.
* ४. 'ECINET' द्वारे मतदार याद्यांवर संपूर्ण ताबा: 'ECINET' आणि 'ERONET' या डिजिटल प्रणालींचा वापर करून मतदार याद्यांच्या डेटावर केंद्रीय पद्धतीने नियंत्रण मिळवण्यात आले असून, यामध्ये फेरफार करण्याची शक्यता निर्माण केल्याचा आरोप नेत्यांनी केला आहे.
* ५. इतर दोन निवडणूक आयुक्तांना डावलणे: मुख्य निवडणूक आयुक्तांनी आयोगाच्या महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये इतर दोन निवडणूक आयुक्तांना पूर्णपणे बाजूला सारून हुकूमशाही पद्धतीने कारभार चालवल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.
* ६. मोदी-शहा यांच्या इशाऱ्यावर काम: निवडणूक आयोग स्वायत्त संस्था म्हणून काम न करता थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या इशाऱ्यावर आणि सांगण्यावरून काम करत असल्याचा थेट आरोप 'इंडिया' आघाडीने केला आहे.



कुंभमेळ्याचा शाही थाट; ३२ हजार कोटींच्या विकासकामांचा गाजावाजा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नाशिक । प्रतिनिधी

नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्याचा शनिवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भव्य शुभारंभ झाला. रामकुंडावर गंगापूजन आणि वैदिक मंत्रोच्चारात धर्मध्वज फडकवून धार्मिक सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. मात्र, या धार्मिक उत्सवाबरोबरच आता तब्बल ३२ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांची चर्चा केंद्रस्थानी आली आहे.



या सोहळ्याला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नाशिक जिल्ह्यातील ६०० ते ६५० गावांमधून आलेल्या सुमारे सहा हजार आदिवासी बांधवांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला. राष्ट्रपती मुर्मू यांनी कुंभमेळ्याला भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकतेचे प्रतीक संबोधले. गोदावरीच्या तीरावर होणारा हा सोहळा देशाच्या समृद्ध परंपरेची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सनातन संस्कृती आणि कुंभमेळ्याच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगामी कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून १० ते १५ कोटी भाविक येण्याचा अंदाज व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर ३२ हजार कोटी रुपयांची विकासकामे हाती घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. कुंभमेळ्याचे अधिकृत गीत आणि संकेतस्थळाचेही लोकार्पण करण्यात आले. मात्र, कोट्यवधींच्या खर्चाचा हा महाप्रकल्प प्रत्यक्षात किती दर्जेदार ठरणार, कामे वेळेत पूर्ण होणार का आणि सार्वजनिक पैशाचा हिशेब पारदर्शक राहणार का, हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. धार्मिक सोहळ्याचा भव्यपणा जितका महत्त्वाचा, तितकीच विकासकामांतील पारदर्शकताही महत्त्वाची ठरणार आहे.

मतदारांचा हक्क हिरावल्याचा काँग्रेसचा आरोप; दिल्लीच्या मैदानात शक्तिप्रदर्शन!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई । प्रतिनिधी

देशातील निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत काँग्रेसने आता दिल्लीच्या रस्त्यावर शक्तिप्रदर्शनाची तयारी केली आहे. मतदार याद्यांमधील कथित घोळ, एसआयआरच्या नावाखाली होणारी नावकपात आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात १ नोव्हेंबर रोजी रामलीला मैदानावर इंडिया आघाडीची महारॅली आयोजित करण्यात आली आहे.



या आंदोलनासाठी महाराष्ट्रातून पाच हजारांहून अधिक काँग्रेस नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते दिल्लीला रवाना होणार आहेत. खासदार, आमदार, माजी मंत्री, माजी खासदार, माजी आमदार आणि विविध आघाड्यांचे पदाधिकारी या रॅलीत सहभागी होणार असल्याची माहिती प्रदेश काँग्रेसकडून देण्यात आली.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पुढाकाराने लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी हा लढा उभारण्यात आल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे केंद्रातील मोदी-शाह सरकारच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून तब्बल १३ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा दावाही पक्षाने केला आहे.

मतदानाचा अधिकार हा संविधानाने दिलेला मूलभूत लोकशाही हक्क आहे. मात्र, मतदार याद्यांमधील कथित फेरफारांमुळे हा अधिकारच धोक्यात येत असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे.

दरम्यान, या महारॅलीतून केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला थेट राजकीय आव्हान देण्याची तयारी विरोधकांनी केली आहे. आता दिल्लीच्या रामलीला मैदानावर विरोधकांची ताकद किती दिसणार आणि या आंदोलनाचा राजकीय परिणाम काय होणार, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

ज्ञानेश कुमार हेच पहिले लक्ष्य; राजीनामा घेतल्याशिवाय माघार नाही!'

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील आंदोलन आता अधिक आक्रमक करण्याचे संकेत कॉंकरोच जनता पार्टीचे सहसंयोजक सौरभ दास यांनी दिले आहेत. ज्ञानेश कुमार हेच आमचे पहिले लक्ष्य असून, त्यांनी पदाचा राजीनामा दिल्याशिवाय कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही, असा थेट इशारा दास यांनी दिला आहे.

'रेड माईक'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी निवडणूक आयोग, केंद्र सरकार आणि आंदोलनादरम्यान झालेल्या अटकेबाबत भूमिका मांडली.

तिहार तुरुंगातील आठ दिवसांच्या वास्तव्यासंदर्भात बोलताना दास यांनी तुरुंगातील अनुभव मजेशीर असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, आठ दिवसांत मोबाईल फोनची आठवणही आली नसल्याचा दावा त्यांनी केला.

आंदोलनात सहभागी झाल्यापासून सरकार आपल्याला तुरुंगात टाकेल याची कल्पना होती. मात्र, इतके दिवस तुरुंगात राहावे लागेल, असे वाटले नव्हते, असे त्यांनी सांगितले.

जंतर-मंतरवरील आंदोलन आणि झेंडा हातात घेऊन गेल्याप्रकरणी गुन्हे शाखेकडून तपास सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुलाखतीदरम्यान झालेल्या विनोदी संवादात सरकारसाठी आपण 'ह्युमन बॉम्ब' असल्याची टिप्पणी त्यांनी केली. या वक्तव्यामुळे त्यांच्या मुलाखतीची चर्चा सुरू झाली आहे.

मात्र, त्यांच्या आक्रमक भूमिकेचा केंद्रबिंदू ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा हाच आहे. निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित करत विरोधकांकडून सातत्याने टीका केली जात आहे.

दास यांच्या वक्तव्यामुळे निवडणूक आयोगाविरोधातील आंदोलनाला आणखी आक्रमक वळण मिळण्याची शक्यता आहे.

लेक लाडकी योजनेसाठी आता अंगणवाडीचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची वेळ आता पालकांवर येणार नाही, असा दावा राज्य सरकारने केला आहे. लेक लाडकी योजनेच्या अर्ज प्रक्रियेत मोठा बदल करण्यात आला असून, आता महाडीबीटी २.० पोर्टलवरून घरबसल्या ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.

महिला व बालविकास विभागाने अर्ज प्रक्रिया डिजिटल करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी पालकांना संबंधित अंगणवाडी केंद्रात जाऊन कागदपत्रांसह अर्ज सादर करावा लागत होता. त्यानंतर अर्ज प्रकल्प कार्यालयाकडे पाठवला जात असे. या प्रक्रियेत अनेक टप्पे असल्याने लाभ मिळण्यास विलंब होत होता. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील पालकांना या प्रक्रियेचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. काही ठिकाणी अंगणवाडी केंद्रांपर्यंत पोहोचणेही कठीण होते. त्यामुळे पात्र असूनही अनेक कुटुंबे योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता होती. ही अडचण दूर करण्यासाठी आता महाडीबीटी २.० पोर्टलवर ऑनलाइन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्ज नोंदणी, कागदपत्रांची छाननी, पडताळणी आणि मंजुरीची प्रक्रिया डिजिटल करण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रांची संख्याही कमी करण्यात आली आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या बदलाची माहिती दिली. अर्जदारांना आपल्या अर्जाची स्थितीही ऑनलाइन तपासता येणार आहे.

केवळ लोकशाही हक्क नव्हे, तर नैतिक गरज; उच्च न्यायव्यवस्थेतील 'पुरुषी वर्चस्व' मोडीत काढण्याची वेळ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारतीय न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च स्तरावर महिलांच्या समान प्रतिनिधित्वाबाबत सुरू असलेली चर्चा आता एका निर्णायक वळणावर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी नुकतेच कॉलेजियम व्यवस्थेतील 'पुरुषांच्या वर्चस्वावर' थेट बोट ठेवत, निर्णयप्रक्रियेत महिला न्यायाधीशांचा समावेश करण्याची केलेली मागणी हा केवळ प्रशासकीय सुधारणेचा भाग नाही, तर तो न्यायव्यवस्थेच्या नैतिकतेशी जोडलेला अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात असलेल्या ३५ न्यायाधीशांपैकी केवळ ३ महिला न्यायाधीश आहेत. हे प्रमाण देशातील कर्तबगार महिला वकील आणि न्यायधीशांच्या संख्येचा विचार करता अत्यंत अपुरे आणि अन्यायकारक आहे.

कनिष्ठ न्यायालयात घवघवीत यश, पण उच्च स्तरावर अडथळे

न्यायव्यवस्थेतील आकडेवारीचे विश्लेषण केल्यास एक अत्यंत महत्त्वाचा विरोधाभास समोर येतो. जेव्हा प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षांसारखे 'वस्तुनिष्ठ' (जलक्षशलींळींश) निकष असतात, तेव्हा महिला मोठ्या संख्येने यश मिळवतात. आसाम, मेघालय, राजस्थान, महाराष्ट्र आणि तेलंगणा या राज्यांमध्ये कनिष्ठ न्यायालयीन सेवांमध्ये (ऋऱॅरवश खखख) महिलांचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक आहे; तर आसाममध्ये हे प्रमाण तब्बल ६७ टक्के आहे. मुख्य न्यायदंडाधिकारी पातळीवर (ऋऱॅरवश खख) देखील महिलांचे प्रतिनिधित्व ४७ टक्के आहे.

परंतु, जेव्हा पदोन्नती आणि उच्च न्यायालये किंवा सर्वोच्च न्यायालयातील नियुक्तीची वेळ येते तिथे कॉलेजियम पद्धतीसारखे 'व्यक्तिनिष्ठ' (डींलक्षशलींळींश) निकष लागू होतात तेव्हा महिलांचे हे प्रमाण अचानक २५ ते ३० टक्क्यांवर घसरते. ही घसरण महिलांच्या क्षमतेच्या अभावामुळे नाही, तर उच्च न्यायव्यवस्थेच्या रचनेत वर्षानुवर्षे चालत आलेल्या अलिखित पुरुषप्रधान मानसिकतेमुळे आणि अपुऱ्या संधींमुळे होते, हे आता उघड झाले आहे.

कॉलेजियममधील सुधारणा: नैतिकतेचा तगादा

न्यायमूर्ती भुयान यांनी सुचवलेला तोडगा अत्यंत व्यावहारिक आणि तात्काळ लागू करण्याजोगा आहे. कॉलेजियमच्या बैठकांमध्ये किमान एका महिला न्यायाधीशांना निमंत्रित सदस्य म्हणून स्थान दिल्यास, पात्र महिला उमेदवारांची बाजू अधिक प्रभावीपणे मांडली जाऊ शकते. जोपर्यंत धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या सर्वोच्च समित्यांमध्ये महिलांचा सहभाग असणार नाही, तोपर्यंत केवळ कनिष्ठ न्यायालयात महिलांची संख्या वाढवून 'महिला सबलीकरण' झाले असा दावा करणे म्हणजे निव्वळ आभास निर्माण करण्यासारखे आहे.

संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. त्यामुळे, जी न्यायव्यवस्था देशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करते, तिने स्वतःच्या अंतर्गत रचनेतही त्या समानतेचे तंतोतंत पालन करणे हे तिचे नैतिक कर्तव्य आहे.

संस्थात्मक परिवर्तनाची गरज

न्यायव्यवस्थेने आता महिलांच्या या सुप्त शक्तीची आणि हक्काची जाणीव उशिराने का होईना, पण स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. ही जाणीव केवळ एका भाषणापुरती मर्यादित न राहता, त्याचे रूपांतर थेट धोरणात्मक बदलांमध्ये झाले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयातील महिला न्यायाधीशांची संख्या वाढवणे हा केवळ एक प्रशासकीय बदल नसेल, तर तो भारतीय लोकशाहीला अधिक परिपक्व आणि सर्वसमावेशक बनवणारा एक क्रांतीकारी टप्पा ठरेल.

उच्च न्यायव्यवस्थेत पारदर्शकता आणणे आणि वकिली क्षेत्रातील महिलांना योग्य ते वरिष्ठ पद मिळवून देणे, हीच खरी संविधानाला अभिप्रेत असलेली नैतिक न्यायप्रणाली असेल.

संपादकीय

सुरत डायमंड बोर्स: ३२०० कोटींची भव्य इमारत आणि हरवलेली बाजारपेठ!

देशात विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचे महाप्रकल्प उभारले जातात, तेव्हा त्यामागे एक मोठे स्वप्न आणि आर्थिक समृद्धीचा उद्धेश असतो. परंतु, प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींमुळे ते प्रकल्प कसे कुपोषित ठरतात, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे गुजरातमधील सुरत डायमंड बोर्स. ३,२०० कोटी रुपये खर्च करून जगातील सर्वांत मोठे कार्यालयीन संकुल म्हणून उभे राहिलेले हे केंद्र आज व्यापारी नसल्यामुळे 'पांढरा हत्ती' ठरत असल्याची चर्चा आहे.

स्वप्न आणि वास्तवातील तफावत

१७ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात या प्रकल्पाचे उद्घाटन झाले. मुंबईतील हिऱ्यांचा व्यापार गुजरातमध्ये आणणे, सुरतला जागतिक हिरे व्यापाराचे आंतरराष्ट्रीय केंद्र बनवणे आणि हजारो रोजगार निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्धेश होता. नऊ भव्य परस्परजोडलेल्या इमारती, तब्बल ४,२०० कार्यालये आणि ६६ लाख चौरस फुटांचे विस्तीर्ण क्षेत्रफळ अशा या प्रकल्पातून सोन्याचे दिवस येतील असा दावा करण्यात आला होता. परंतु, प्रकल्पाच्या उद्घाटनाला तीन वर्षे उलटून गेल्यानंतरही, इंडियन एक्सप्रेसच्या ताज्या अहवालानुसार, ४,२०० पैकी केवळ ३०० कार्यालयांमध्येच प्रत्यक्ष कामकाज सुरू आहे. म्हणजेच, तब्बल ९३ टक्के कार्यालये अजूनही व्यापाऱ्यांच्या प्रतीक्षेत आहेत.

व्यापारी सुरतमध्ये का थांबत नाहीत? कार्यालय खरेदी करूनही व्यापारी सुरतमध्ये व्यवसाय सुरू करण्यास तयार नाहीत, यामागे काही ठोस कारणे आहेत:

१. मुंबईचे मजबूत व्यावसायिक जाळे: मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील 'भारत डायमंड बोर्स'मध्ये वर्षानुवर्षे आंतरराष्ट्रीय खरेदीदार, दलाल, बँका आणि वित्तीय संस्थांचे एक अथांग जाळे तयार झाले आहे. केवळ आलिशान कार्यालयात बसून व्यापार होत नाही, त्यासाठी ग्राहक, विश्वास आणि जुनी व्यावसायिक नाती लागतात.

२. भौगोलिक अडचण: सुरतमधील खजोड परिसरात उभारलेला हा डायमंड बोर्स शहरातील जुन्या बाजारपेठांपासून (महिधरपुरा आणि वराछा) खूप दूर आहे. तेथे जाण्या-येण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय ग्राहकांसाठी आवश्यक सुविधांचा अभाव जाणवला.

३. मोठ्या ब्रँड्सचे पाऊल माघारी: ज्या किरण जेम्सच्या वल्लभभाई लाखाणी यांनी सुरत बोर्समध्ये मोठी जागा घेत व्यवसाय हलवण्याचा प्रयत्न केला, त्यांना अवघ्या दीड महिन्यात पुन्हा मुंबईत कार्यालय सुरू करावे लागले. हा उद्योजकांसाठी मोठा इशारा होता.

जागतिक बाजारातील मंदी आणि नवे संकट

या अपयशामागे केवळ वाहतूक किंवा मुंबईची स्पर्धा नाही, तर हिरे बाजारपेठ ज्या जागतिक संकटातून जात आहे, त्याचाही मोठा फटका बसला आहे:

* **चीनमधील मागणी घटली:** चीनमधील आर्थिक मंदीमुळे नैसर्गिक हिऱ्यांच्या मागणीवर मोठा परिणाम झाला आहे.

* **लॅब-ग्रोन डायमंड्सची (प्रयोगशाळेतील हिरे) स्पर्धा:** नैसर्गिक हिऱ्यांसारखेच दिसणारे पण अतिशय स्वस्त असणारे लॅब-ग्रोन हिरे आता बाजारपेठ काबीज करत आहेत. भारत आणि चीन या दोन्ही देशांमध्ये याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे.

* **रशियावरील पाश्चात्त्य निर्बंध:** रशियाच्या 'अल्रोसा' कंपनीकडून येणाऱ्या हिऱ्यांवर अमेरिकेने निर्बंध आणल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी गुंतागुंतीची झाली आहे.

या सर्व कारणांमुळे गेल्या काही वर्षांत नैसर्गिक पॉलिश केलेल्या हिऱ्यांच्या घाऊक किमती जवळपास ३० ते ५० टक्क्यांनी घसरल्या आहेत. २०२० मधील प्रति कॅरेट ५,५०० डॉलर असलेली किंमत २०२५ मध्ये ४,२०० डॉलरवर आली आहे.

निष्कर्ष: केवळ इमारती म्हणजे विकास नव्हे!

सुरत हे हिरे कापणी आणि पॉलिशिंगचे जगातील अग्रगण्य केंद्र आहे. पण हिरे घडवणे आणि आंतरराष्ट्रीय बाजारात त्यांची विक्री करणे यात मोठा फरक आहे. सरकारने इमारत उभी केली, पण आंतरराष्ट्रीय खरेदीदार, सुलभ दळणवळण, मालवाहतूक आणि संपूर्ण व्यावसायिक इकोसिस्टम निर्माण करण्यात कुठेतरी नियोजन कमी पडले. नुकतेच भाजपचे खासदार गोविंदभाई धोलकिया यांनी व्यापाऱ्यांना दिवाळीनंतर सुरत बोर्समध्ये कार्यालय सुरू करण्याचे भावनिक आवाहन केले. यावरून आजही व्यापाऱ्यांना बोलावण्यासाठी विनवण्या कराव्या लागत असल्याचे स्पष्ट होते. कोणत्याही शहरात आकाशाला भिडणाऱ्या इमारती उभारणे म्हणजे आर्थिक विकास नव्हे. ४,२०० कार्यालये बांधता येतात, पण तितक्याच व्यापाऱ्यांना तिथे टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक विश्वास आणि पुरक वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. अन्यथा, जनतेच्या पैशातून उभा राहिलेला हा ३,२०० कोटींचा प्रकल्प केवळ एका भव्य वास्तूचा देखावा बनून राहील.

शेतकरी दुष्काळात होरपळतोय, कुंभमेळ्यावर ३५ हजार कोटींचा खर्च! रोहित पवारांचा सरकारला घेराव

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

एका बाजूला मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळाने उद्ध्वस्त होत आहे, तर दुसऱ्या बाजूला नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी हजारो कोटींच्या खर्चाचा गाजावाजा सुरू आहे. याच मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे.

कुंभमेळ्याच्या विकासकामांच्या नावाखाली तब्बल ३५ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणी सरकारविरोधात कायदेशीर लढाई उभारण्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत.

रोहित पवार यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचा मुद्दा उपस्थित केला. दुष्काळात होरपळणाऱ्या अन्नदात्याच्या हातावर पाच हजार रुपये ठेवून सरकार त्याची थट्टा करत आहे. मात्र, कुंभमेळ्याच्या नावाखाली होणाऱ्या हजारो कोटींच्या



खर्चाचा हिशेब द्यायला सरकार तयार नाही, अशी टीका त्यांनी केली. कुंभमेळ्याच्या निधीतून होणाऱ्या कामांमध्ये अनियमितता, निकृष्ट दर्जा आणि भ्रष्टाचाराचे आरोप होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या कामांची अधिकृत माहिती मिळवण्यासाठी विविध शासकीय विभागांकडे पत्रव्यवहार करण्यात आला. माहिती अधिकारांतर्गत अर्जही दाखल करण्यात आले. मात्र, जाणीवपूर्वक माहिती दडवली जात असल्याचा आरोप पवार यांनी केला. सरकारकडून विकासाच्या घोषणा केल्या जात असताना प्रत्यक्ष खर्चाचा तपशील जनतेसमोर का आणला जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

आता या आरोपांना सरकार काय उत्तर देणार आणि कथित अनियमिततेची चौकशी होणार का, याकडे लक्ष लागले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या मदतीवर काटकसर आणि मोठ्या प्रकल्पांवर हजारो कोटींचा खर्च, या विरोधाभासामुळे सरकारची कोंडी झाली आहे.

एकतेच्या नावाखाली पुण्यात राजकीय शक्तिप्रदर्शन! अमित शाह यांच्या हस्ते 'रन फॉर युनिटी'चा प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

पुण्यात राष्ट्रीय एकता दौडच्या निमित्ताने मोठ्या कार्यक्रमाची तयारी सुरू झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते १५ नोव्हेंबर रोजी 'पुणे रन फॉर युनिटी २०२६'चा प्रारंभ होणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून आयोजित या स्पर्धेत ४० हजारांहून अधिक नागरिक सहभागी होतील, असा आयोजकांचा अंदाज आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी या दौडचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा 'नशामुक्त युवा, सशक्त युवा आणि



विकसित भारत' हा संदेश देण्यावर भर असेल.

या स्पर्धेत २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉन, १० मैल, १० किलोमीटर, ५ किलोमीटर फन रन आणि ३ किलोमीटर कौटुंबिक धाव अशा पाच गटांचा समावेश आहे. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि व्यावसायिक धावपटूंनाही सहभागी होता येणार आहे.

विशेष म्हणजे केनियासह आफ्रिकेतील काही देशांमधील आंतरराष्ट्रीय धावपटूही स्पर्धेत सहभागी होणार आहेत. विजेत्यांसाठी १० लाख रुपयांहून अधिक रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

गेल्या वर्षी या उपक्रमात २५ हजारांहून अधिक पुणेकर सहभागी झाले होते. यंदा सहभागाचा आकडा ४० हजारांवर नेण्याचे उद्धिष्ट आयोजकांनी ठेवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही उपस्थिती राहणार आहे. व्यसनमुक्ती, आरोग्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याचा या उपक्रमाचा उद्धेश असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

मात्र, अशा मोठ्या आयोजनांमध्ये केवळ गर्दीचा आकडा महत्त्वाचा नसून, युवकांपर्यंत आरोग्य आणि व्यसनमुक्तीचा संदेश प्रत्यक्ष पोहोचतो का, हेच खरे आव्हान आहे.

दिवाळीच्या खरेदीने पुण्यातील बाजारपेठेत नवचैतन्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे । प्रतिनिधी

रंगीबेरंगी आकाशकंदील, पणत्या, तोरणांनी सजलेली दुकाने आणि खरेदीसाठी कुटुंबासह बाहेर पडलेल्या नागरिकांची लगबग... दिवाळीच्या चाहुलीने शनिवारी शहरातील बाजारपेठा चैतन्याने फुलून गेल्या होत्या. सुट्टीचे औचित्य साधत अनेकांनी शनिवारी ((दि.३१)) खरेदीसाठी बाहेर पडणे पसंत केल्याने मध्यवर्ती पेठांमध्ये सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ होती.

तुळशीबाग, महात्मा फुले मंडई, रविवार पेठ आणि परिसरात कपडे, सजावटीचे साहित्य, पूजेच्या वस्तू तसेच फराळासाठी लागणाऱ्या जिन्नसांची खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. दुकानांसह रस्त्यालगतच्या विक्रेत्यांकडेही ग्राहकांची रेलचेल दिसून येत होती. तुळशीबागेत घरगुती वस्तू, कपडे, दागिने आणि तोरणांच्या दुकानांमध्ये खरेदीला वेग आला होता. रंगीबेरंगी आकाशकंदील, विद्युत रोषणाईच्या माळा, रांगोळी आणि विविध प्रकारच्या पणत्या ग्राहकांचे लक्ष वेधून घेत होत्या. पारंपरिक मातीच्या पणत्यांसोबतच आकर्षक सजावटीच्या वस्तूंनाही बाजारात स्थान मिळाले होते. महात्मा फुले मंडई आणि परिसरात कृत्रिम फुले तसेच पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी सुरू होती. फराळाच्या तयारीसाठी धान्य, डाळी, सुकामेवा आणि इतर जिन्नस घेण्यासाठीही नागरिक बाजारात आले होते. रविवार पेठेतील कपडे, भेटवस्तू आणि इतर साहित्याची दुकानेही ग्राहकांनी गजबजली होती.

त्यांच्या ताकदीला पदवीधरांनी दाखवला ठेंगा; प्रताप पाटलांचा विजय म्हणजे मतदारांचा 'प्रताप'!



■ बीड । सुभाष चौरे

राजकारणात पैसा, सत्ता आणि बड्या नेत्यांचे आशीर्वाद म्हणजे विजयाची हमी, असा समज करून घेणाऱ्यांना मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निकालाने जोरदार चपराक दिली आहे. तब्बल १८ वर्षे मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे सतीश चव्हाण यांना पराभवाचा धक्का देत महाविकास आघाडीचे डॉ. प्रताप पाटील यांनी ऐतिहासिक विजय मिळवला. हा विजय नेत्यांच्या ताकदीपेक्षा मतदारांच्या नाराजीचा अधिक बोलका पुरावा ठरला आहे.

गेल्या तीन टर्मपासून सतीश चव्हाण यांनी मतदारसंघावर आपली पकड कायम ठेवली होती. मात्र, दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर निर्माण झालेली प्रस्थापितविरोधी भावना, पदवीधरांचे प्रलंबित प्रश्न आणि स्थानिक पातळीवरील नाराजी यांचा फटका त्यांना बसल्याचे दिसते. विशेष म्हणजे, या निवडणुकीत दोन्ही बाजूंच्या बड्या नेत्यांचा प्रचारातील सहभाग मर्यादित राहिला. महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठीही मराठवाड्यातील मोठे नेते पूर्ण ताकदीने मैदानात उतरले नव्हते. तरीही मतदारांनी डॉ. प्रताप पाटील यांच्या बाजूने कौल दिला. महायुतीतील अंतर्गत नाराजी, स्थानिक नेत्यामधील मतभेद आणि मतदारांपर्यंत प्रभावीपणे न पोहोचलेला प्रचार यामुळे चव्हाण यांची अडचण वाढल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. या निकालाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे. मतदारांना कायम गृहीत धरता येत नाही. पद, सत्ता आणि राजकीय वजन यापेक्षा कामाचा हिशेब महत्त्वाचा असतो. नेत्यांनी प्रचार केला किंवा नाही, यापेक्षा मतदारांनी कोणाला नाकारायचे हे ठरवले. म्हणूनच हा केवळ डॉ. प्रताप पाटील यांचा विजय नाही, तर प्रस्थापित राजकारणाला मतदारांनी दिलेला स्पष्ट इशारा आहे. लोकशाहीत अंतिम शब्द नेत्यांचा नसतो; तो मतदारांचाच असतो!

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो ३: पहिल्या टप्प्यात धावणार 'या' १७ स्थानकांवर; ६ स्थानके सध्या बंदच

■ पुणे : प्रतिनिधी

पुणेकरांची, विशेषत: हिंजवडी आयटी पार्कमध्ये जाणाऱ्या हजारो आयटी कर्मचाऱ्यांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी मेट्रो ३ (पिंक लाईन) सज्ज होत आहे. माण ते शिवाजीनगर दरम्यानच्या १३.२ किलोमीटर लांबीच्या या संपूर्ण मार्गावर एकूण २३ स्थानके आहेत. मात्र, पहिल्या टप्प्यात केवळ १७ स्थानकांवरच प्रवाशांसाठी वाहतूक सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

उर्वरित ६ स्थानकांचे बांधकाम आणि आवश्यक सुरक्षा मंजुरीची प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने ती स्थानके तुरतास बंद राहतील.

पहिल्या टप्प्यात सुरू होणारी १७ स्थानके खालीलप्रमाणे:

१. माण
२. माण-एमआयडीसी सर्कल
३. माण बस डेपो
४. हिंजवडी फेज दोन-सर्कल दोन
५. हिंजवडी फेज दोन-सर्कल एक
६. पद्मभूषण चौक
७. श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज चौक - हिंजवडी
८. हिंजवडी फेज एक
९. वाकड चौक
१०. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल (बालेवाडी / म्हाळुंगे)
११. मायकॉन - बालेवाडी
१२. आर. के. लक्ष्मण म्युझियम - बालेवाडी
१३. औंध
१४. सकाळनगर
१५. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
१६. कृषी महाविद्यालय
१७. जिल्हा न्यायालय, पुणे

सध्या बंद राहणारी ६ स्थानके:

बांधकाम आणि सुरक्षेच्या कारणास्तव बालेवाडी हाय स्ट्रीट, बालेवाडी फाटा, बाणेर गाव, बाणेर-पाषाण लिंक रोड, भोसले नगर आणि शिवाजीनगर या स्थानकांवर पहिल्या टप्प्यात मेट्रो थांबणार नाही.

या नव्या मेट्रो मार्गिकेमुळे हिंजवडी, वाकड, बालेवाडी, बाणेर आणि शिवाजीनगर परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दिवाळीपूर्वी बोनस-वेतन न देणाऱ्या ठेकेदारांवर फौजदारी कारवाईचा इशारा!

ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट करण्याचा मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांचा इशारा; बोनससाठी परिपत्रक काढण्याचे आदेश

■ पिंपरी : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असलेल्या कंत्राटी व मानधन कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस आणि वेतन मिळावे, यासाठी महापालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. कामगारांना निर्धारित वेळेत बोनस व वेतन अदा न करणाऱ्या ठेकेदारांवर कामगार कायद्यानुसार फौजदारी कारवाई करून संबंधितांना ब्लॅकलिस्ट करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांनी दिला आहे.

राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी महापौर रवी लांडगे यांची भेट घेऊन कंत्राटी व मानधन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांना बोनस मिळावा, हा मुद्दा प्राधान्याने मांडण्यात आला.

या बैठकीला मुख्य कामगार कल्याण अधिकारी



प्रमोद जगताप यांनाही उपस्थित राहण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या. त्यानुसार कंत्राटी व मानधन कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस देण्याबाबत परिपत्रक काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे परिपत्रक सोमवारी सकाळपर्यंत जारी केले जाणार असल्याची माहिती जगताप यांनी दिली. परिपत्रकाद्वारे महापालिकेच्या विविध विभागांत काम करणाऱ्या कंत्राटदारांना कर्मचाऱ्यांचा बोनस वेळेत अदा करण्याच्या सूचना दिल्या जाणार आहेत. तसेच वेतन वितरणातही विलंब होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येणार आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या ठेकेदारांवर कायदेशीर कारवाईसह फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल, असे जगताप यांनी स्पष्ट केले. दरम्यान, कामगारांच्या अन्य प्रलंबित प्रश्नांवरही महापौरांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, संबंधित विषयांवर स्वतंत्र बैठक घेऊन सविस्तर चर्चा व निर्णय घेतले जाणार आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कंत्राटी व मानधन कर्मचाऱ्यांना बोनस आणि वेतन वेळेत मिळणार की पुन्हा ठेकेदारांच्या विलंबाचा फटका कामगारांना बसणार, याकडे आता कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

सारांश वृत्त

पुणे न्यायालयात घातला गोंधळ! ६ जणांना दंडाचा दणका; माफीनंतरही शिक्षेतून सुटका नाही

पुणे : प्रतिनिधी

न्याय मागण्यासाठी आल्यावर भर न्यायालयातच त्यांच्यात वाद सुरु झाला. त्यांच्यातील वादावादीमुळे तब्बल दहा मिनिटे न्यायालयीन कामकाज ठप्प झाल्याने न्यायालयाने त्याची गंभीर दखल घेतली. न्यायालयाने सहा जणांना प्रत्येकी एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डॉ. जी. आर. डोरनलपल्ले यांनी हा आदेश दिला. विशेष म्हणजे, न्यायालयाची माफी मागूनही चौघांची शिक्षेतून सुटका झाली नाही.

समर्थ पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्याच्या सुनावणीसाठी फिर्यादी आणि आरोपी न्यायालयात उपस्थित होते. सुनावणीदरम्यान त्यांच्यात वादावादी झाली. न्यायालयाबाहेर गेलेला वाद पुन्हा न्यायालयात पोहोचल्याने गोंधळ उडाला. परिणामी, न्यायालयीन कामकाजात अडथळा निर्माण झाला. हा प्रकार उपस्थित वकिलांसमोर घडला. तिघांनी न्यायालयाची माफी मागत सौम्य शिक्षा देण्याची विनंती केली. मात्र, न्यायालयीन कामकाजात अडथळा निर्माण करणे आणि न्यायालयाचा अवमान करणे ही गंभीर बाब असल्याचा युक्तिवाद सरकारी पक्षाच्या वतीने सरकारी वकील योगेश कदम यांनी केला. त्याची दखल घेत न्यायालयाने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३८४ नुसार तिघांना प्रत्येकी एक हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास एक महिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

आंबेगावच्या पूर्व भागात अखेर पावसाची हजेरी; रब्बी पिकांना मिळाले जीवदान!

मांदळेवाडी परिसरात शुक्रवारी रात्री पावसाची सर; दुष्काळी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

बेगाव तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या अनेक दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने अखेर शुक्रवारी (दि. ३०) रात्री हजेरी लावली. मांदळेवाडी परिसरात रात्री सात वाजण्याच्या सुमारास पावसाच्या सरी कोसळल्याने रब्बी हंगामातील पिकांना काही प्रमाणात जीवदान मिळाले आहे. आधीच दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी आणि पशुपालकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला असून, शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने पाठ फिरविल्याने शेतकरी चिंतेत होते. रब्बी हंगामातील पेरणी, उगवलेली पिके जगविणे आणि जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था अशा अनेक समस्यांनी शेतकऱ्यांना ग्रासले होते. पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिके सुकण्याच्या मार्गावर होती. अशा परिस्थितीत गेल्या चार दिवसांपासून परिसरात ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने पावसाची शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर शुक्रवारी रात्री झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा दिला.

पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही हजेरी महत्त्वपूर्ण ठरली आहे. पावसाअभावी वाढ खुंटलेल्या आणि सुकण्याच्या मार्गावर



असलेल्या रब्बी पिकांना या पावसामुळे नवसंजीवनी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होणार असल्याने पिकांच्या वाढीसाठीही हा पाऊस उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे.

शेतीबरोबरच पशुपालकांसाठीही हा पाऊस दिलासादायक ठरू शकतो. रानातील हिरवळ वाढण्यास मदत होऊन जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्याची अपेक्षा आहे. आधीच पावसाच्या खंडामुळे चारा आणि पाण्याच्या टंचाईचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना या पावसाने आशेचा किरण दाखविला आहे.

मात्र, मांदळेवाडी परिसरात झालेला हा पाऊस संपूर्ण पूर्व भागातील दुष्काळी परिस्थिती दूर करण्यासाठी पुरेसा नाही. मोठ्या आणि समाधानकारक पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. त्यामुळे आगामी काळात पावसाने सातत्य राखणे गरजेचे आहे. तरीही अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत असून, रब्बी हंगामाबाबत नव्याने आशा निर्माण झाली आहे.

मराठवाड्यात रब्बी हंगामालाही दुष्काळाचा विळखा! २० टक्के पेरणीचेही वांधे, जमिनीत ओलावा नाही, सिंचनासाठी पाणी नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

खरीप हंगामाने शेतकऱ्यांच्या हातात निराशा दिल्यानंतर आता रब्बी हंगामही संकटाच्या खाईत लोटला जात आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या तीन जिल्ह्यांत रब्बीची २० टक्के पेरणी होणेही कठीण असल्याचा धक्कादायक अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांसाठी शेतीचे संपूर्ण वर्षच संकटात जाण्याची चिन्हे आहेत.

जमिनीत ओलावा नाही, विहिरी आणि जलस्रोतांची पाणीपातळी खालावली आहे, तर पावसानेही मोठी ओढ दिली आहे. अशा परिस्थितीत पेरणी करायची तरी कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. विभागीय संशोधन सल्लागार समितीच्या बैठकीत कृषी



विभागानेच पेरणीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली.

या तीन जिल्ह्यांचे रब्बीचे सरासरी क्षेत्र ७ लाख २८ हजार हेक्टर आहे. मागील पाच वर्षांत सरासरी ९ लाख ४९ हजार हेक्टरवर पेरणी झाली होती. गतवर्षी हेच क्षेत्र १० लाख ९४ हजार हेक्टरवर पोहोचले होते. मात्र, यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे नियोजन केवळ २ लाख ७० हजार हेक्टरवर आणावे लागले आहे.

त्यातही प्रत्यक्ष पेरणीचे उद्दिष्ट गाठण्याची खात्री नाही. ज्वारी, हरभरा, गहू आणि मक्यासारखी पिके घेण्याचे नियोजन असले तरी पाण्याअभावी त्यावरही प्रश्नचिन्ह आहे. तिन्ही जिल्ह्यांत सरासरीच्या केवळ ७० टक्के पाऊस झाला. मात्र, पावसाच्या आकडेवारीने शेतकऱ्यांचे नुकसान झाकले जात नाही. आता खरीप गेले आणि रब्बीही हातातून जाण्याची भीती आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना केवळ आकडेवारी नव्हे, तर ठोस आर्थिक मदत आणि पाणी नियोजनाची गरज आहे.

कुरिअरच्या पार्सलमध्ये भीषण स्फोट! लातूर हादरले; कर्मचारी गंभीर भाजला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लातूर । प्रतिनिधी

कुरिअरच्या पार्सलमधून नेमके काय आले होते? हा साधा प्रश्न आता लातूरमधील एका भीषण स्फोटानंतर गंभीर बनला आहे. शनिवारी सकाळी खासगी कुरिअर कंपनीच्या वाहनातून पार्सल उतरवताना अचानक जोरदार स्फोट झाला. या दुर्घटनेत एक कर्मचारी गंभीररीत्या भाजला असून, घटनास्थळी बंदूक आढळल्याने खळबळ उडाली आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील कुरिअर कार्यालयासमोर



हा प्रकार घडला. इतर शहरांतून आलेल्या मालवाहू वाहनातील पार्सल उतरवण्याचे काम सुरू असतानाच एका पार्सलचा अचानक स्फोट झाला.

स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की वाहनाचे छत आणि काचा फुटल्या. परिसरात धुराचे आणि आगीचे लोट पसरले. यावेळी पार्सल हाताळणारा कर्मचारी थेट आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. नागरिकांनी तत्काळ त्याला जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच लातूर पोलिसांसह श्वान पथक आणि न्यायवैद्यक तपास पथक घटनास्थळी दाखल झाले. अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनीही घटनास्थळाची पाहणी केली.

दरम्यान, स्फोट झालेल्या वाहनात एक बंदूक आढळल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. पार्सलमध्ये नेमका कोणता पदार्थ होता? स्फोट अपघाती होता की घातपाताचा प्रकार? पार्सल कोणी पाठवले आणि त्याचा उद्देश काय होता? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. तपास पूर्ण होईपर्यंत स्फोटाचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही

गोदातीरावर सिंहस्थाचा शंखनाद; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण!

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभपर्वाची मंगलमय नांदी; वैदिक मंत्रघोष, शंखनाद आणि संत-महंतांच्या उपस्थितीत रामतीर्थावर सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नाशिक, : प्रतिनिधी

गोदावरीच्या पवित्र तीरावर वैदिक मंत्रोच्चार, शंखनाद आणि साधू-संतांच्या उपस्थितीत नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभपर्वाच्या स्वागताचा मंगलमय प्रारंभ झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नाशिक येथील रामतीर्थावर भगव्या धर्मध्वजेचे ध्वजारोहण करण्यात आले. यज्ञाहुती, गोदापूजन आणि धर्मध्वजापूजन अशा धार्मिक विधींनी पार पडलेल्या या सोहळ्यामुळे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला औपचारिक स्वरूपात धार्मिक अधिष्ठान लाभले.

बारा वर्षांनी येणाऱ्या सिंहस्थ कुंभपर्वाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सोहळ्याला संत-महंत, विविध आखाड्यांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवी धर्मध्वजा आकाशात फडकताच शंखनाद आणि मंगलवाद्यांच्या गजराने रामतीर्थ परिसर दुमदुमून गेला.

वैदिक विधींनी धर्मध्वजारोहण

धर्मध्वजारोहणापूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यज्ञकुंडात आहुती अर्पण केली. त्यानंतर जीवनदायिनी गोदावरीचे विधिवत पूजन करून धर्मध्वजेला वंदन केले. पुरोहितांच्या वैदिक मंत्रोच्चारात त्यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मंत्रपुष्पांजली अर्पण करण्यात आली. धार्मिक परंपरेनुसार पार पडलेल्या या विधींनी सिंहस्थ कुंभपर्वाच्या स्वागताला सुरुवात झाली.

या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार, केंद्रीय आयुष तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, पालकमंत्री गिरीश महाजन, मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील, दादाजी भुसे, जयकुमार रावल, संजय सावकारे, नरहरी झिरवाळ, नितेश राणे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, खासदार राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे आणि डॉ. शोभा बच्छाव आदी उपस्थित होते.

संत-महंतांच्या उपस्थितीत आध्यात्मिक सोहळा

विविध आखाड्यांचे महंत, धर्माचार्य आणि साधू-संतांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, श्रीमहंत ज्ञानदास महाराज, मंगलपीठाधीश्वर श्री १००८ माधवाचार्य महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष श्रीमहंत रवींद्रपुरी महाराज, श्री पंच निर्मोही अन्नी आखाड्याचे श्रीमहंत राजेंद्रदास महाराज यांच्यासह महंत संजयदास महाराज, मुरलीदास महाराज, वैष्णवदास महाराज, माधवदास महाराज, मोहनदास महाराज, भक्तिचरणदास महाराज आणि रामस्नेही महाराज उपस्थित



होते. धार्मिक विधींचे पौरोहित्य पुरोहित संघाचे सतीश शुक्ल आणि अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी यांनी केले.

सिंहस्थ कुंभपर्वाची परंपरा आणि महत्त्व

सिंहस्थ कुंभपर्व हे भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचे पर्व मानले जाते. देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे दर्शन, पवित्र स्नान आणि संतसंगतीसाठी येतात. विविध भाषा, प्रांत आणि संप्रदायांतील भाविकांना जोडणारा हा श्रद्धेचा उत्सव आहे. गोदावरीच्या तीरावर फडकलेली धर्मध्वजा या परंपरेचे प्रतीक असून, आगामी कुंभपर्वाच्या स्वागताची नांदी ठरली आहे.

कुंभमेळ्यासाठी प्रशासकीय तयारीला वेग

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी पायाभूत सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षितता आणि भाविकांसाठी आवश्यक नागरी सुविधांचे नियोजन सुरू आहे. देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांना सुरक्षित आणि सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. प्राचीन धार्मिक परंपरेचे पावित्र्य जपत आधुनिक व्यवस्थापनाच्या माध्यमातून कुंभमेळ्याचे नियोजन करण्यावर भर दिला जात आहे.

या कार्यक्रमाला आमदार सुहास कांदे, गोकुळ गिते, राहुल ढिकले, देवयानी फरांदे, सीमा हिरे, सरोज अहिरे, दिलीप बनकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त जलज शर्मा, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा, अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे आणि प्रमोद पवार आदी उपस्थित होते.

धर्मध्वजावरील शुभचिन्हांचे प्रतीकात्मक महत्त्व

सिंहस्थ धर्मध्वजावर श्री गंगा-गोदावरी धर्मध्वजाशी संबंधित विविध शुभचिन्हे अंकित करण्यात आली आहेत. त्यावरील अमृतकुंभ अमरत्व, मुक्ती आणि देवीशक्तीचे प्रतीक मानला जातो. ओमकार हे विश्वव्यापकता आणि सकारात्मकतेचे, तर 'श्री' अक्षर विजय व मांगल्याचे प्रतीक आहे. ध्वजावरील १२ रेशमी गोंडे सामाजिक एकता आणि संघशक्ती दर्शवितात. एक घंटा आणि तीन घुंगरू नाद व ब्रह्मनादाचे प्रतीक आहेत. ध्वजाच्या दुसऱ्या बाजूला गोदावरीचे वाहन मानली जाणारी मगर तसेच सूर्य आणि चंद्र यांची शुभचिन्हे अंकित करण्यात आली आहेत.

राष्ट्रपतींच्या हस्ते झालेल्या धर्मध्वजारोहणामुळे नाशिकच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेला राष्ट्रीय स्तरावर विशेष अधोरेखित करणारा सोहळा पार पडला. गोदावरीच्या साक्षीने फडकलेली भगवी धर्मध्वजा आगामी सिंहस्थ कुंभपर्वाच्या स्वागताची आणि तयारीच्या नव्या पर्वाची मंगलमय नांदी ठरली.

आंबेगावच्या पूर्व भागात काकड आरतीचे सूर; पहाटेच्या भक्तिमय वातावरणाने मंदिरे दुमदुमली!

टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठलनामाचा जयघोष; धार्मिक परंपरेतून सामाजिक एकोपा आणि वारकरी संस्कृतीचा जागर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावागावांत सध्या काकड आरतीचे सूर घुमू लागले असून, पहाटेच्या प्रसन्न वातावरणात मंदिरांमध्ये भक्तिमय चैतन्य निर्माण झाले आहे. टाळ-मृदंगाचा निनाद, विठ्ठलनामाचा जयघोष, संतांचे अभंग, भूपाळ्या, गवळणी आणि विविध देवतांच्या आरत्यांनी गावोगावची मंदिरे दुमदुमत आहेत. थंडीची चाहूल लागलेली असतानाही पहाटे लवकर उठून मंदिरात उपस्थित राहणाऱ्या महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि वारकरी भाविकांचा उत्साह या धार्मिक परंपरेतून अनुभवायला मिळत आहे.

आंबेगाव तालुक्याला वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा लाभली आहे. धार्मिक श्रद्धा, संतविचार आणि सामूहिक भक्ती यांचा सुंदर संगम काकड आरतीच्या माध्यमातून पाहायला मिळतो. अनेक गावांमध्ये ही परंपरा अनेक वर्षांपासून पिढ्यान्पिढ्या जपली जात आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील अवसरी, निरगुडसर, भराडी, जवळे, पारगाव, मेंगडेवाडी, शिंगवे,



काठापूर, लाखणगाव, देवगाव, पोंदेवाडी, जारकरवाडी, रानमळा, वाळुंजनगर, लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळेवाडी, पहाडदरा, खडकवाडी आणि शिरदाळे या गावांमध्ये काकड आरतीची परंपरा धार्मिक उत्साहात सुरू आहे. या कार्यक्रमांमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक आणि भजनी मंडळांचा सहभाग विशेष महत्त्वाचा असतो. महिला अभंग, भूपाळ्या आणि आरत्या म्हणत भक्तिरसात तल्लीन होतात, तर पुरुष मंडळी टाळ-मृदंगाची साथ देतात. ग्रामस्थ एकत्र येऊन मंदिर परिसराची स्वच्छता, रांगोळी आणि पूजेची तयारी करतात. त्यामुळे धार्मिक कार्यक्रमाबरोबरच सामूहिक सहभागाची भावनाही वृद्धिंगत होत आहे.

काकड आरतीच्या निमित्ताने गावातील नागरिकांना एकत्र येण्याची संधी मिळते. परस्परांमधील आपुलकी, सामाजिक सलोखा आणि एकोपा वाढण्यास मदत होते. लहान मुलांना संतांचे अभंग, पारंपरिक भक्तिगीते आणि वारकरी संप्रदायातील संस्कारांची ओळख होते. ग्रामीण भागातील सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उपक्रमातून होत आहे.

आधुनिक जीवनशैलीतील धावपळ आणि ताणतणावाच्या वातावरणात काकड आरतीसारखे उपक्रम मनाला शांतता देणारे ठरत आहेत. सामूहिक नामस्मरण, संतविचारांचे श्रवण आणि भक्तिमय वातावरणामुळे भाविकांना मानसिक समाधान मिळत आहे. धार्मिक श्रद्धेच्या पलीकडे जाऊन सामाजिक एकोपा, सामूहिक शिस्त आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करणारा हा उपक्रम ठरत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये काकड आरतीची परंपरा अधिक व्यापक व्हावी, तरुण पिढीनेही त्यात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा आणि वारकरी संप्रदायाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा पुढे न्यावा, अशी अपेक्षा भाविकांकडून व्यक्त होत आहे. पहाटेच्या शांत वातावरणात घुमणारा 'जय जय राम कृष्ण हरी'चा गजर, टाळ-मृदंगाचा नाद आणि संतांच्या अभंगांतून मिळणारी जीवनमूल्यांची शिकवण यामुळे गावोगावच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनात नवचैतन्य निर्माण होत आहे.

सारांश वृत्त

व्यापाऱ्याची पाच लाखांची बॅग हिसकावण्याचा प्रयत्न करणारी टोळी जेरबंद; मार्केटयार्डमधील ३० लाखांच्या दरोड्याचाही उलगडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे / प्रतिनिधी

व्यापाऱ्याला धारदार शस्त्राने वार करून पाच लाख रुपयांची रोकड असलेली बॅग हिसकावण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीला स्वारगेट पोलिसांनी जेरबंद केले आहे. या आरोपींची चौकशी केली असता मार्केटयार्ड परिसरात व्यापाऱ्याच्या ३० लाख रुपयांच्या रोकड रकमेवर टाकलेल्या दरोड्याचाही उलगडा झाला आहे. पोलिसांनी आरोपींकडून कार, दुचाकी, सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल, घड्याळे आणि रोख रकमेसह सुमारे २४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्वारगेट पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६), ३(५) तसेच भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हे पाच लाख रुपयांची रोकड घेऊन जात असताना सॅलिसबरी पार्क येथील गोलीवाला भवन परिसरात तीन अज्ञात आरोपींनी त्यांचा पाठलाग केला. त्यानंतर संगनमताने धारदार लोखंडी शस्त्राने त्यांच्यावर वार करून त्यांना जखमी केले आणि त्यांच्याकडील पाच लाख रुपये असलेली बॅग हिसकावून नेण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला.

चारा उत्पादनासाठी जिल्हा नियोजन निधीतील ५ टक्के निधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई । प्रतिनिधी

अल-निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण घटल्याने राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी राज्य शासनाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा उत्पादन, उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन आणि पर्यायी चारा स्रोत विकसित करण्यासाठी किमान पाच टक्के निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच चारा बँकांची स्थापना, हायड्रोपोनिक्स व अझोला पद्धतीने चारा उत्पादन, आंतरजिल्हा चारा वाहतूक आणि चारा छावण्यांचे डिजिटल पद्धतीने व्यवस्थापन अशा विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना सुचविण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीच्या निर्णयानुसार महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाने चारा टंचाईवर मात करण्यासाठी विविध शिफारशी केल्या आहेत. २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत या शिफारशी स्वीकारण्यात आल्या असून, त्यानुसार ३० ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्यातील २०२६ मधील दुष्काळजन्य परिस्थितीत चारा टंचाईवर मात करण्यासाठी चारा उत्पादन वाढविणे, उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन व मूल्यवर्धन, चारा छावण्यांचे पारदर्शक व्यवस्थापन आणि पर्यायी चारा स्रोत विकसित करण्यासह विविध शिफारशी अभ्यासगटाने केल्या आहेत.

नियोजनबद्ध उपाययोजना

पंकजा मुंडे म्हणाल्या, ''दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, पशुपालक आणि त्यांच्या पशुधनाला चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी शासनाने नियोजनबद्ध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. केवळ चारा छावण्या सुरू करण्यापुरते मर्यादित न राहता चाऱ्याचे उत्पादन वाढविणे, उपलब्ध चाऱ्याचे योग्य संवर्धन करणे आणि पर्यायी चारा स्रोत विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी.''

पशुसंवर्धन संस्थांच्या प्रक्षेत्रावरही चारा लागवड

अभ्यास गटाने सुचविलेल्या आराखड्यानुसार रब्बी हंगामात चारा बियाण्यांची कमतरता भासू नये, यासाठी महाबीज आणि इतर बियाणे उत्पादकांच्या माध्यमातून बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कमी पाण्यात येणाऱ्या आणि एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणाऱ्या चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे आणि कृषी महामंडळाच्या जमिनीवर मका, न्यूट्रीफीड, शुगरग्रेझ, ज्वारी आणि बाजरी यासारख्या चारा पिकांची लागवड करण्यात येणार आहे. पशुसंवर्धन विभागाच्या अखत्यारीतील संस्थांच्या प्रक्षेत्रावरही चारा लागवड केली जाणार आहे.

गायरान, कुरण, नापीक आणि पडीक जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्यासाठी विविध विभागांच्या योजनांचा समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या सहकार्याने गाळपेरा क्षेत्र चारा लागवडीसाठी शेतकरी आणि पशुपालकांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. वन विभागाच्या जमिनीवर उपलब्ध असलेले गवत वेळेत कापून त्याची साठवणूक केली जाणार असून, आवश्यकतेनुसार ते पशुपालकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासाठी जिल्हानिहाय चारा बँका स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यासाठी शेतकरी उत्पादक संस्था, कंपन्या आणि स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जाणार आहे.

नोव्हेंबरमध्येही उष्णतेचा तडाखा कायम! देशातील बहुतांश भागांत तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा आयएमडीचा अंदाज

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

ऑक्टोबर संपत असतानाच देशात थंडीची चाहूल लागण्याची अपेक्षा असताना नोव्हेंबर महिन्यातही उष्णतेचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. देशातील बहुतांश भागांमध्ये कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (खचृ) वर्तवला आहे. त्यामुळे यंदा नोव्हेंबरमध्येही नागरिकांना अपेक्षित थंडीपासून दिलासा मिळण्याची शक्यता कमी आहे.

शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर केलेल्या मासिक हवामान अंदाजात खचृ ने ही माहिती दिली. हिमालयाच्या पायथ्यालगतच्या काही भागांचा अपवाद वगळता देशाच्या बहुतांश प्रदेशांत कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. हिमालयाच्या पायथ्याशी मात्र कमाल तापमान सामान्य किंवा सामान्यपेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे.

केवळ दिवसाचे तापमानच नव्हे, तर रात्रीच्या तापमानातही वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

देशातील बहुतांश भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. मात्र मध्य आणि पूर्व भारतातील अनेक भागांत किमान तापमान सामान्य किंवा सामान्यपेक्षा कमी राहू शकते.

दरम्यान, नोव्हेंबर महिन्यात देशाच्या बहुतांश भागांत पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता आहे. मध्य भारत, वायव्य भारत आणि ईशान्य भारतातील काही भागांत मात्र सामान्य ते सामान्यपेक्षा अधिक पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

एकीकडे पावसाचे प्रमाण कमी आणि दुसरीकडे दिवसासह रात्रीच्या तापमानात वाढ, असे चित्र नोव्हेंबरमध्ये दिसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेती, पाणी व्यवस्थापन आणि दैनंदिन जनजीवनावर या हवामान बदलांचा काय परिणाम होतो, याकडे लक्ष लागले आहे.

भारतीय हवाई दलात नेतृत्वबदल! एअर मार्शल इंदरपाल सिंग वालिया नवे उपप्रमुख; आशुतोष दीक्षित हवाई दलाच्या प्रमुखपदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी



भारतीय हवाई दलाच्या वरिष्ठ नेतृत्वात महत्त्वाचा बदल होणार आहे. एअर मार्शल इंदरपाल सिंग वालिया यांची भारतीय हवाई दलाच्या पुढील उपप्रमुखपदी (Vice Chief of the Air Staff) नियुक्ती करण्यात आली आहे. संरक्षण मंत्रालयाने शुक्रवारी, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भातील घोषणा केली.

सध्याचे उपप्रमुख एअर मार्शल आशुतोष दीक्षित हे शनिवारी, ३१ ऑक्टोबर रोजी भारतीय हवाई दलाचे २९ वे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. त्यांच्या जागी एअर मार्शल वालिया जबाबदारी सांभाळतील. त्यामुळे हवाई दलाच्या सर्वोच्च नेतृत्वात महत्त्वपूर्ण फेरबदल होत आहे.

एअर मार्शल इंदरपाल सिंग वालिया यांना हवाई दलाच्या विविध महत्त्वाच्या विभागांमध्ये काम करण्याचा अनुभव आहे. त्यांनी हवाई दलाच्या डायरेक्टरेट ऑफ एअर स्टाफ इन्स्पेक्शनचे (ASI) प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय जपान आणि दक्षिण कोरिया येथील भारतीय दूतावासांमध्ये संरक्षण प्रतिनिधी (Defence Attachμ) म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

त्यांनी भारतीय हवाई दलाच्या पूर्व हवाई कमांडमध्ये वरिष्ठ एअर स्टाफ अधिकारी (Senior Air Staff Officer) म्हणूनही सेवा बजावली आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाज, हवाई दलाची कार्यपद्धती आणि आंतरराष्ट्रीय संरक्षणविषयक संबंधांचा त्यांना अनुभव आहे.

भारताच्या बदलत्या संरक्षण विषयक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हवाई दलाच्या नेतृत्वातील हा बदल महत्त्वाचा मानला जात आहे. हवाई सुरक्षेची सज्जता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि संरक्षण दलांचे सामरिक सामर्थ्य वाढवण्याची जबाबदारी नव्या नेतृत्वासमोर असेल.

दिल्ली-एनसीआरमधील प्रदूषणकारी कारखान्यांवर टाळेबंदीची टांगती तलवार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

दिल्ली-NCR मधील वाढत्या वायुप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या औद्योगिक कंपन्यांविरोधात कठोर पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. प्रदूषण नियंत्रण यंत्रणा (APCDs) बसवण्यासाठी अद्याप ऑर्डर न देणाऱ्या औद्योगिक युनिट्सना थेट टाळेबंदीचा सामना करावा लागू शकतो.

शुक्रवारी, ३० ऑक्टोबर रोजी पाठवलेल्या पत्रातून उझउइ ने दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमधील प्रदूषण नियंत्रण यंत्रणांना कारवाईचे निर्देश दिले. दिल्ली प्रदूषण नियंत्रण समिती (DPCC) आणि संबंधित राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांना नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांना तातडीने कारणे दाखवा नोटिसा बजावण्यास सांगण्यात आले आहे.

कमिशन फॉर एअर क्वालिटी मॅनेजमेंटच्या (CAQM) सुधारित उत्सर्जन निकषानुसार ज्या औद्योगिक कंपन्यांना प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसवणे किंवा जुन्या यंत्रणांचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, त्यांच्यावर ही कारवाई होणार आहे.

नोटीस मिळाल्यानंतर संबंधित उद्योगांना उपकरणे खरेदी करण्यासाठी ऑर्डर दिल्याचा पुरावा सादर करण्यासाठी केवळ पाच दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत पुरावा सादर न करणाऱ्या उद्योगांचे कामकाज बंद करण्याचे आदेश दिले जाऊ शकतात. उपकरणे बसवण्याचे विश्वासार्ह वेळापत्रक सादर करून नियमांचे पालन सिद्ध करेपर्यंत त्यांना बंदच राहावे लागणार आहे.

विशेष म्हणजे, ही कारवाई पूर्णपणे नवीन नसली तरी हिवाळ्यातील प्रदूषणाचा हंगाम सुरू होण्यापूर्वी अंमलबजावणी अधिक कठोर करण्याचा CPCB चा हा प्रयत्न आहे.

दिल्ली-NCR मध्ये दरवर्षी हिवाळ्यात औद्योगिक उत्सर्जनासह विविध कारणांमुळे हवेची गुणवत्ता खालावते. अशा परिस्थितीत प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांवर प्रशासन किती प्रभावीपणे कारवाई करते, याची आता परीक्षा लागणार आहे.



सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन

नाशिक, दि. ३१ (जिमाका वृत्तसेवा) : भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक येथील राजगड शासकीय विश्रामगृहात त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा उपस्थित होत्या.

शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये जमा होण्याचा मुहूर्त ठरला, 'या' जिल्ह्यापासून वाटप झालं सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

दुष्काळ जाहीर केलेल्या ३०४ तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयाची नुकसान भरपाई अग्रीम स्वरूपामध्ये देण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून मंजुरी देण्यात आलेली आहे. साधारणपणे शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६ पासूनच शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये मदतीचे वितरण केले जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. मात्र काही तांत्रिक कारणास्तव अद्यापही शेतकऱ्यांना या मदतीची प्रतीक्षा आहे.

दरम्यान सोमवार ०२ नोव्हेंबर २०२६ पासून शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये मदतीचे वितरण केली जाण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून मदतीचा वितरण केलं जात असून युजर आयडी पासवर्ड हा तहसील कार्यालयाचा देण्यात आलेला आहे. दुष्काळ वाटपाचा निधी तहसील कार्यालयाच्या माध्यमातून फार्मर आयडीच्या आधारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा केला जाणार आहे.

विशेष म्हणजे प्रायोगिक तत्वावर दुष्काळ मदत निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ट्रान्स्फर करण्याचा प्रयोग करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातालुक्यातील तांदळवाडी गावात प्रायोगिक तत्त्वावर १० शेतकऱ्यांना या मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

ही संपूर्ण प्रक्रिया तहसीलदार एफ. आर. शेख यांच्या नियोजन व मार्गदर्शनाखाली अचूकपणे राबविण्यात आली आहे.

दिलासा देण्यासाठी शासनाच्या वतीने ५ हजार रुपयांचे अग्रीम मदत वाटपाची प्रक्रिया सुरू झाली आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा झाल्याचे मेसेजही त्यांना आले आहेत. या मदत वाटपासाठी शासनाने स्वतंत्र पोर्टल विकसित केले असून, याद्या तयार करणे व लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत करण्याची सुविधा प्रत्येक तहसीलदारांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतीचे पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित पैसे शेतकऱ्यांना मिळतील.

प्रश्न विचारणारा समाजच लोकशाहीचा खरा रक्षक; पुराव्याशिवाय दावे स्वीकारणारा समाज हुकूमशाहीसमोर असहाय्य!

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांचा इशारा; वैज्ञानिक दृष्टिकोन प्रयोगशाळेपुरता नको, तर तरुणांच्या विचारांमध्येही हवा; संविधानातील 'आम्ही'चा स्वीकार करण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक समजणारा, पुराव्याशिवाय केलेले दावे निमूटपणे स्वीकारणारा आणि परंपरेच्या नावाखाली प्रत्येक गोष्टीला प्रश्नांच्या पलीकडे ठेवणारा समाज लोकशाहीसाठी धोकादायक ठरतो. अशा समाजाला चुकीची माहिती सहजपणे प्रभावित करू शकते आणि हुकूमशाहीसमोर तो असहाय्य बनतो, असा महत्त्वपूर्ण इशारा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी दिला आहे. आजच्या काळातील राजकीय आणि सामाजिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विधानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मेघालयातील युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याची गरज अधोरेखित करताना त्यांनी केवळ विज्ञानाच्या प्रयोगशाळांमध्ये संशोधन करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने, विशेषतः तरुणांनी आणि विद्यार्थ्यांनी, कोणत्याही दाव्याची चिकित्सा करणे, पुरावे तपासणे आणि तर्कशुद्ध विचार करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ५१ (अ) मध्ये नागरिकांची मूलभूत कर्तव्ये नमूद करण्यात आली आहेत. त्यातील अनुच्छेद ५१ (अ) (ह) नुसार वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, जिज्ञासा आणि सुधारणावादी वृत्ती विकसित करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. न्यायमूर्ती भुयान यांनी याच घटनात्मक तरतुदीचा संदर्भ देत वैज्ञानिक दृष्टिकोन हा केवळ शैक्षणिक विषय किंवा प्रयोगशाळेतील संशोधनापुरता मर्यादित ठेवता येणार नाही, असे सांगितले. सार्वजनिक जीवनात, सामाजिक व्यवहारात आणि राजकीय निर्णयप्रक्रियेतही त्याचे प्रतिबिंब दिसले पाहिजे, हा त्यांच्या भाषणाचा महत्त्वाचा आशय होता.

त्यांच्या मते, पुरावा न तपासता एखादी गोष्ट खरी मानणे, प्रश्न विचारण्याची भीती बाळगणे आणि परंपरेच्या नावाखाली अन्यायकारक प्रथांनाही आव्हान न देणे, या प्रवृत्ती समाजाला बौद्धिकदृष्ट्या कमकुवत करतात. अशा वातावरणात अफवा, अपप्रचार आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीला खतपाणी मिळते. परिणामी, सत्तेला प्रश्न विचारण्याची क्षमता कमी होते आणि लोकशाही व्यवस्थेतील उत्तरदायित्व कमकुवत होण्याचा धोका निर्माण होतो.

आज माहिती आणि समाजमाध्यमांच्या विस्फोटाच्या काळात हा मुद्दा अधिक गंभीर आहे. एखादा दावा किती वेळा प्रसारित झाला किंवा किती लोकांनी त्यावर विश्वास ठेवला, यापेक्षा त्याच्या समर्थनार्थ कोणते पुरावे आहेत, हा प्रश्न विचारण्याची सवय समाजाने लावून घेतली पाहिजे. लोकप्रियता म्हणजे सत्य आणि बहुमत म्हणजे न्याय, असे समीकरण लोकशाहीला परवडणारे नाही. न्यायमूर्ती भुयान यांच्या भाषणातून याच विवेकवादी भूमिकेचे महत्त्व अधोरेखित होते.

या भाषणात त्यांनी समाजातील 'आम्ही' आणि 'ते' अशी विभागणी करण्याच्या मानसिकतेऐवजी संविधानाच्या उद्देशिकेतील 'आम्ही भारताचे लोक' या सामूहिक ओळखीचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. धर्म, जात, भाषा, प्रदेश किंवा वैचारिक मतभेदांच्या आधारे समाजाचे तुकडे करण्याऐवजी नागरिक म्हणून समान घटनात्मक मूल्यांवर एकत्र येणे आवश्यक आहे, असा या आवाहनाचा व्यापक अर्थ आहे.

वास्तविक, लोकशाही केवळ निवडणुका घेण्याने जिवंत राहत नाही. सरकारला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य, सत्तेच्या निर्णयांची चिकित्सा, पुराव्यांवर आधारित सार्वजनिक चर्चा आणि अन्यायकारक परंपरांमध्ये सुधारणा करण्याची तयारी या गोष्टीही तितक्याच महत्त्वाच्या असतात. प्रश्न विचारणाऱ्याला शत्रू समजण्याची मानसिकता वाढली, तर लोकशाहीची संस्थात्मक रचना अस्तित्वात असूनही तिचा आत्मा कमकुवत होऊ शकतो.

न्यायमूर्ती भुयान यांचा इशारा म्हणूनच केवळ विद्यार्थ्यांसाठी किंवा वैज्ञानिकांसाठी नाही, तर संपूर्ण समाजासाठी महत्त्वाचा आहे. कारण ज्या समाजात प्रश्न विचारण्याची हिंमत संपते, तिथे सत्तेला उत्तर देण्याची गरजही उरत नाही. आणि लोकशाहीसाठी हीच सर्वाधिक धोकादायक परिस्थिती असते.